ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख २ जून, १९५४ | अंक ११

## विविध माहिती

**चंदनाच्या झाडावरील कीड**—चंदनाच्या झाडाला लागणाऱ्या किडीवर उपाय-योजना करण्यासाठी इंटर-स्टेट सँडलवुड ॲडव्हायजरी कमिटीची बैठक नुकतीच भरली होती. चंदनाच्या झाडांना 'स्पोक' नांवाचा एक रोग होतो त्यावर उपाय सुचविण्यासाठी ५ तज्ज्ञांची एक समिति नेमण्यांत आली. मद्रास, म्हैसूर आणि कूर्ग राज्यांचे प्रतिनिधी कमिटीच्या बैठकीसाठी आले होते.

**रशिआला रेल्वेचें प्रतिनिधी-मंडळ**—रशिअन सरकारच्या आमंत्रणावरून भारतीय रेल्वेजचें तीन सभासदांचें एक प्रतिनिधि-मंडळ रशिआला जाणार आहे. रशिअन रेल्वेचें कामकाज समजून घेण्यासाठी तें जूनमध्यें रशिआला जाईल. रशिआंत त्यांचा मुक्काम ४ ते ५ आठवडे राहील. रशिआंतील रेल्वे-रस्ते ५७,००० मैल लांबीचे आहेत. फाळणीनंतर भारतीय रेल्वेची लांबी ३४,००० मैल झाली. अमेरिकन रेल्वे-मार्ग २,२८,००० मैल आहे.

**अमेरिकन उद्योगपतींना इशारा**—स्वतंत्र जगांतील लोकांनीं एकसारखी विकास पावणारी अर्थव्यवस्था आपण स्थापूं शकूं असें सिद्ध न केल्यास जगांतील लोक रशिआच्या पुढारीपणाकडे झुकूं लागतील असा इशारा अमेरिकन परराष्ट्र-मंत्री मि. जॉन फॉस्टर डलेस ह्यांनीं दिला आहे. अर्थ-व्यवस्थेचा सदोदित विस्तार करण्याचें अमेरिकन उद्योगपतींना जमलें नाहीं तर अमेरिकन परराष्ट्रीय धोरणाचा पायाच ढांसळेल, असेंहि ते म्हणाले.

**कु. अनीता बोससाठी ट्रस्ट**—सुभाषचंद्र बोस ह्यांची कन्या कु. अनीता बोस सध्यां व्हिएन्नांत रहात आहे. आय. एन. ए. फंडांतून २ लाख रुपये बाजूला काढून त्यावरील व्याज अनीताला २१ वर्षें वय होईपर्यंत देण्यांत येणार आहे. त्यानंतर सर्वच रक्कम तिच्या स्वाधीन करण्यांत येईल. डॉ. बी. सी. रॉय आणि पं. नेहरू हे दोघे फंडाचे ट्रस्टी नेमण्यांत आले आहेत.

**मलायांतील मोहिमेवर होणारा खर्च**—मलायामध्यें कम्युनिस्टांचा उच्छेद करण्यासाठी गेलीं सात-आठ वर्षें ब्रिटननें लष्करी कारवाया चालविल्या आहेत. ह्या कामीं ब्रिटनला दरवर्षी २ कोटी पौंड खर्च येत आहे, अशी माहिती कॉमन्स सभागृहांत सांगण्यांत आली. लष्करी उपायांसाठी खर्च करण्यास ६० लाख पौंडांची रक्कम सरकारनें प्रत्यक्षच मंजूर केलेली आहे.

**रानटी मंगोलिअन घोड्यांची खरेदी**—ब्रिटनमधील व्हिप्स-नेड प्राणिसंग्रहालयासाठी मंगोलिआंतील दोन रानटी घोडे मिळविण्यांत आले आहेत. हे घोडे संग्रहालयाच्या अधिकाऱ्यांनीं प्रागमधील प्राणिसंग्रहालयाकडून नुकतेंच लंडनला आणले आहेत. घोड्यांची किंमत २,६०० पौंड आहे. त्यांना शिकवून तयार करणें अशक्य आहे, असा अनुभव आहे.

**त्रिमिति चित्रपटाला लागणारे चष्मे**—त्रिमिति चित्रपट पहाण्यासाठी विशिष्ट प्रकारचे चष्मे प्रेक्षकांना चित्रगृहांतर्फे पुरविण्यांत येतात. हे चष्मे वापरल्यामुळें डोळ्यांच्या रोगांचा प्रसार होण्याचा संभव असल्यानें मुंबई सरकारनें असा हुकूम काढला आहे कीं, प्रेक्षकांना देण्यांत येण्यापूर्वी ते निर्जंतु करण्यांत आले पाहिजेत.

**भारतामधील साखरेचें उत्पादन**—भारतांत दर एकरीं साखरेचें जास्तींत जास्त उत्पादन १२८ टन करण्यांत आलेलें आहे, असें समजतें. तथापि दर एकरीं साखरेची सरासरी निर्मिति मात्र १२ टनच आहे. इंडोनेशिआंत दर एकरीं सरासरी ३५·५ टन साखर तयार होते.

**तेनसिंग नोर्केचें चरित्र**—मि. जेम्स उलमन नांवाच्या अमेरिकन ग्रंथकारानें गौरीशंकर शिखरावर आरोहण करणारा तेनसिंग नोर्के ह्यांचें चरित्र लिहिण्याचें ठरविलें आहे. मि. उलमन हे भारतांत येऊन तेनसिंगासह हिमालयांत फिरणार आहेत. पुस्तकाचें प्रकाशन एक इंग्लिश कंपनी करणार आहे.

**बडीं पांच राष्ट्रें कोणतीं ?**—जिनीव्हा येथें सध्यां चालू असलेल्या परिषदेंत कम्युनिस्ट चीनला बडें राष्ट्र म्हणून मानण्यास इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स ह्यांनीं नकार दिलेला आहे. तथापि खुद्द जिनीव्हांतील एका दुकानदारानें इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, रशिआ आणि चीन ह्या राष्ट्रांच्या परिषदेंतील पुढाऱ्यांचे फोटो व त्या राष्ट्रांचीं निशाणें आपल्या दुकानावर लावलीं आहेत. त्यानें आपल्या पुरता हा प्रश्न धंदेवाईक दृष्टीनें सोडवून टाकला आहे.

**लेनिनच्या पत्राची किंमत**—प. जर्मनींतील एका लिलांव-वाल्यानें १,९०० रुपये देऊन लेनिननें लिहिलेलें एक पत्र खरेदी केलें. सुप्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञानी फ्रेडरिक नित्शे ह्यानें लिहिलेल्या १८ पत्रांची किंमत २,३३४ रुपये आली. जर्मन कवि गटे ह्यानें लिहिलेल्या एका पत्राची किंमत १,२८८ रुपये झाली.

**ब्रिटनच्या टांकसाळीनें बजावलेली कामगिरी**—गेल्या वर्षी ब्रिटिश सरकारच्या टांकसाळीनें निरनिराळ्या प्रकारचीं ४५,६०,००,००० नाणीं पाडलीं. त्यांपैकीं २२,२०,००,००० नाणीं खुद्द ब्रिटनसाठी पाडण्यांत आलीं आणि १०,९०,००,००० नाणीं राष्ट्रकुलांतील राष्ट्रांसाठी पाडण्यांत आलीं. १२,५०,००,००० नाणीं परदेशांच्या सरकारांसाठी पाडण्यांत आलीं.

**हिंदी पुस्तकाला बक्षिस**—बालसाहित्यांत उत्कृष्ट ठरणाऱ्या स्वतंत्र अगर भाषांतरित हिंदी पुस्तकाला बक्षिसें देण्याची योजना सप्टेंबर १९५२ मध्यें भारतीय सरकारनें जाहीर केली होती. ह्या योजनेंतील पहिलें १,००० रुपयांचें बक्षीस श्री. रघुवीर दयाळ मिश्र ह्यांच्या 'हैदर अली' ह्या पुस्तकाला देण्यांत आलें आहे.

## रॅशनलायझेशन : कामगार विरुद्ध ग्राहक !

"कापडाच्या गिरण्यांत नवी यंत्रसामुग्री बसविली नाहीं तर काय होईल ? कांहीं दिवसांनी महाग पडणारें कापड विकणें अशक्य होईल व परदेशांतील बाजारपेठांस आपण मुकूं. भारताचें निर्गत कापडाचें मूल्य १०० कोटी वार (सध्याच्या उत्पादनाच्या एकपंचमांश) एवढें आहे. निर्गत झाली नाहीं तर सध्याच्या कामगारांपैकीच १,४८,००० कामगार बेकार होतील. पण तेवढ्यावरच भागणार नाहीं. गिरण्या कमी कपाशीचा व स्टार्चचा उठाव करतील. त्यामुळें गिरण्यांवर अवलंबून असणाऱ्या दुय्यम धंद्यांतील रोजगारहि कमी होईल. सध्याच्या २,००,००० मागांचे जागीं ऑटोमॅटिक माग बसविले, तर माग चालविणारांपैकी १,८०,००० कामगार बेकार बनतील, असें एका प्रमुख कामगार पुढाऱ्यानें सांगितलें आहे. पण त्याचें गणित चुकीचें आहे. एका चुटकीसरशी सर्व माग ऑटोमॅटिक केले, तरी ७५,००० कामगारांची आवश्यकता राहीलच. कांहीं झालें तरी, नवें माग बसविण्याची गति मंदच राहाणार. कारण, गिरणीमालकांचे जवळ पुरेसा पैसा आहे कोठे ? महाग यंत्रसामुग्री बसविली, म्हणजे ज्यास्त पाळ्या गिरणी चालविण्याची प्रवृत्ति निर्माण होईल व त्यामुळें रोजगारावरील परिणाम वाटतो तितका तीव्र होणार नाहीं. कापडाची किंमत वारामागें सरासरी ९ पै एवढी कमी झाली, म्हणजे जनतेला पूर्वीच्याच पैशानें आणखी ३६ कोटी वार कापड विकत घेता येईल. ह्यामुळें काम सुटलेल्यांपैकी ५४,००० कामगारांना पुन: काम मिळेल. गिरण्यांत ७,४२,००० कामगार आहेत, पण देशांत ३६१ कोटी गिऱ्हाइकें आहेत; त्यांच्या हिताकडेहि थोडें लक्ष देण्याची वेळ आतां आलेली आहे. ह्या गिऱ्हाइकांना आपण ज्यास्त आणि अधिक चांगलें कापड पूर्वीपेक्षां स्वस्त दरानें देणार आहोंत, कीं त्यांना कमी आणि अधिकाधिक वाईट कापड वाढत्या दरानें आपण पुरविणार आहोत ?" :—मुंबई गिरणीमालक संघाचे अध्यक्ष, सर नेव्हिल एन. वाडिया, ह्यांचें संघाच्या वार्षिक सभेंत भाषण.

---

**मिरा बेन काश्मीरांत काम करणार**—काश्मीर सरकारच्या आमंत्रणावरून महात्मा गांधींच्या शिष्या मिराबेन काश्मीरमध्यें जाऊन गांधी तत्त्वज्ञानाप्रमाणें खेड्यांच्या उद्धाराची संघटना उभी करणार आहेत. तेहरी गढवाल येथील गोपाल आश्रम बंद करून त्या काश्मीरला जाणार आहेत. गांधीजींच्या कल्पनेप्रमाणें ग्रामीण विकास घडवून आणण्यासाठीं उत्तर प्रदेश सरकारनें त्यांना ९ लाख रुपयांची रक्कमहि मंजूर केली आहे.

**काश्मीरच्या प्रवाशांची सोय**—काश्मीरला जाणाऱ्या प्रवाशांची सोय करण्यासाठी पश्चिम रेल्वेनें फ्रँटिअर मेलमध्यें पठाणकोटपर्यंत तडक जाणारा सुखद हवामान राखणारा डबा जोडण्याचें ठरविलें आहे. ता. १६ मे पासून असा डबा जोडण्यांत येऊं लागला आहे. हा डबा धरून फ्रँटिअर मेलमध्यें असे तीन डबे होतील. त्या सर्वांत मिळून ४२ प्रवाशांची सोय होईल.

**ब्रिटनमधील वैमानिक प्रवासी**—१९५३ सालीं ब्रिटनमध्यें आलेल्या व तेथून बाहेर गेलेल्या वैमानिक प्रवाशांची संख्या ७४,८४,५०० इतकी भरली. १९५२ सालच्या तुलनेनें प्रवाशांच्या संख्येंत ५ टक्के वाढ झालेली आहे.

**लग्नानिमित्त देण्यांत आलेला हुंडा**—प. बंगालमधील बेगुलसराई तहसिलांत मेच्या १२ तारखेला एकाच दिवशीं २,००० लग्नें लावण्यांत आलीं. वरपक्षाला देण्यांत आलेल्या हुंड्याची एकूण रक्कम १५,००,००० रुपये झाली, असें समजतें.


**THE TRAVANCORE OGALE GLASS MANUFACTURING Co. Ltd.,**

# NOTICE

The Eleventh Annual General Meeting of the Shareholders of the Travancore Ogale Glass Manufacturing Company Limited, will be held at the Registered Office of the Company at the Glass Factory Premises, Manjummel, Alwaye, on Saturday, the 26th June, 1954, at 5 p. m. to transact the following business.

1. To receive and adopt the Directors' Report and audited Balance Sheet and Profit and Loss Account for the period ended 31st December, 1953.
2. To elect Directors in the place of those retiring.
3. To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

The Share Transfer Books of the Company will be closed from Monday, the 14th June to Saturday, the 26th June, 1954, both days inclusive.

By Order of the Board,
**For OGALE BROTHERS LIMITED,**

Trivandrum, April 15, 1954. — **N. P. OGALE,** Managing Agents.

---

**ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड, ओगलेवाडी.**

# नोटीस

वरील कंपनीच्या भागीदारांची तेहतिसावी वार्षिक साधारण सभा ओगलेवाडी येथें कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसमध्यें सोमवार ता. ५ जुलै १९५४ रोजीं दोन प्रहरीं ३-३० वाजतां खालील कामकाजांचा विचार करणेसाठीं भरणार आहे.

(१) डायरेक्टर्स यांनीं केलेला रिपोर्ट व ता. ३१-१२-५३ अखेरचा हिशोब-तपासनिसांनीं तपासलेला ताळेबंद व नफा-तोटापत्रकें स्वीकारून त्यास मंजुरी देणें.

(२) आर्टिकल्स ऑफ असोसिएशन कलम १०६ प्रमाणें श्री. पी. एन्. आगटे, रा. ब. गणेश गोपाळ शेंबेकर व श्री. शांपूर पापण्णा हे बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवरील आपल्या जागा सोडीत असून त्यांचे जागीं तीन डायरेक्टर्सची निवड करावयाची आहे. जागा सोडणारे डायरेक्टर्स पुन्हा निवडून येण्यास पात्र असून ते त्या जागांसाठीं उभे आहेत.

(३) चालू सालासाठीं ऑडिटर्स नेमून त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

कंपनीचीं शेअर ट्रॅन्स्फर बुकें ता. १५ जून ते ५ जुलै १९५४ अखेर (दोन्हीं दिवस धरून) बंद राहतील.

| | |
|---|---|
| ओगलेवाडी, | बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या |
| जिल्हा:- | हुकुमावरून, |
| उत्तर सातारा, | एस्. पी. ओगले |
| तारीख | आणि कं., |
| ३० मार्च १९५४ | मॅनेजिंग एजंट्स. |

---

**सूचना**—आपल्या पत्त्यांत कांहीं फेरबदल झाल्यास तो कृपा करून कंपनीकडे सत्वर कळवावा.

# अर्थ

बुधवार, ता. १ जून, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सरकारी खर्चावर हितकारक नियंत्रण

भारताच्या विकासासाठी मोठमोठे कार्यक्रम आखले जात आहेत, त्यांच्या खर्चासाठी मोठमोठ्या रकमा मंजूर होत आहेत व त्यांच्या तरतुदीसाठी कर्जे उभारण्यांत येत आहेत. ह्या कर्जास हातभार लावणें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्यच आहे. तथापि, जनतेच्या पैशाचा विनियोग कार्यक्षमतेनें, काटकसरीनें व जबाबदारीच्या जाणीवेनें होतो किंवा नाहीं, ह्या गोष्टीकडे विशेष लक्ष पुरविण्यांत आलें पाहिजे. भारतीयांच्या रहाणीचा दर्जा कनिष्ठ, त्यांचें बचत करण्याचें सामर्थ्य बेताचेंच, भांडवल संचयाला त्यामुळें बऱ्याच मर्यादा आणि विकासाची गरज मात्र मोठी व तातडीची, अशा परिस्थितींत उपलब्ध साधनांचा उपयोग अत्यंत दक्षतेनें केला जाणें अगत्याचें आहे. युद्धाच्या घाईच्या व आणीबाणीच्या काळांत अमर्याद खर्चास मोकळीक मिळते, तशी सवड विकासासाठी कटिबद्ध झालेल्या अर्थयोजनेंत मिळतां कामा नये. खर्च होणाऱ्या प्रत्येक रुपयाचें चीज झालें पाहिजे.

अशी परिस्थिति असतांनाहि कित्येक उच्च सरकारी अधिकाऱ्यांत आवश्यक ती जाणीव नसल्याचें आढळून येतें. विचाराचा अभाव, निष्काळजीपणा, किंवा त्याहूनहि अधिक अपायकारक अवगुणांचा भुर्दंड जनतेवर पडतो व तिच्या वाजवी अपेक्षा फलद्रूप होणें अवघड होतें. कामाचा भांडवली खर्च वाढला, म्हणजे त्याची खंडणी कित्येक पिढ्यांना पुढें देत रहावी लागते. ऑडिटर जनरल व पार्लमेंटची पब्लिक अकौंटस् आणि एस्टिमेटस् कमिटी ह्यांच्या अहवालांनीं पाडलेला प्रकाश उद्बोधक आहे. ह्या दोघांनींहि उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे व दोषस्थळें दाखवून जनतेच्या पैशाचा योग्य विनियोग होण्याचें महत्त्व पटवून दिलें आहे.

सरकारी पैशाचा कसा अपव्यय होतो, ह्याचीं दिलेलीं उदाहरणें खांचखळगे दाखवितात आणि उघडकीस न आलेलीं कितीतरी प्रकरणें असतील त्यांचा विचार केला तर ही गळती थांबविण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचें महत्त्व तात्काळ पटतें. अर्थखात्याचें इतर खर्चिक खात्यांवर प्रभावी नियंत्रण असण्याची जरूरी त्यानें सिद्ध होत आहे. अर्थखात्याच्या नियंत्रणामुळें कामांस दिरंगाई होते, हें खरें असलें तरी खर्च करणारीं खातीं नीट योजना न आखतां भरमसाट खर्च करीत सुटतात व हा खर्च पुष्कळ वेळां अनाठायीं असतो, ही अर्थखात्याची तक्रारहि खोटी नाहीं. खर्चावर वाजवी नियंत्रण, कामाची पद्धतशीर आखणी, काटकसरीचा व जबाबदारीचा कारभार, देशहितास प्राधान्य, इत्यादि गोष्टींचें महत्त्व स्वयंसिद्ध आहे. तथापि, योजनांच्या अंमलबजावणींत सुधारणेस वाव आहे एवढ्यासाठी सरकारला कर्ज मिळणें अवघड पडतां कामा नये. पूर्वीची युद्धजन्य व भरभराटीच्या काळांतील खर्चिक वृत्ति आतां पालटत चालली आहे व कारभारविषयक नियंत्रणांचा हितकारक परिणाम होत आहे, ही आशादायक गोष्ट समजली पाहिजे.

## बँकनिवाडा आणि सरकार

बँकनिवाड्यावर निर्णय घेण्याची मुदत दोन महिन्यांनीं सरकारनें वाढवून घेतली आहे, ही एक स्वागतार्ह घटना आहे. निवाड्याचा हिंदी बँकिंगच्या भवितव्यावर होणाऱ्या परिणामाचा सूक्ष्म विचार सरकारला करणें जरूर वाटत आहे, असा त्याचा अर्थ आहे. निवाड्यानें देवविलेले पगार अंमलांत आले, तर बँकांना ते परवडणार नाहींत आणि त्यामुळें बँकांचा नफा घटेल, एवढेंच नव्हे तर बँकिंगच्या प्रगतीसहि आळा बसेल, असें बँकर्सचें म्हणणें आहे. आपले नफे टिकविण्यासाठी बँकांना कर्जावरील व्याजाचे दर वाढवावे लागतील, बँकिंग चार्जेसमध्यें वाढ होईल व बँकांच्या सोईचा प्रसार खुंटेल ही घटना गिऱ्हाइकांच्या दृष्टीनें इष्ट होणार नाहीं. आधुनिक बँकिंगचा प्रसार लहान गांवांतून व ग्रामीण विभागांतून व्हावा, ह्यासाठी सरकार व रिझर्व्ह बँक मार्ग शोधून काढीत आहेत, परंतु लहान ठिकाणीं शाखा उघडण्यास मोठ्या बँकांना आतां उत्तेजन वाटणार नाहीं, इतकेंच नव्हे तर बँक अवार्डमधील तरतुदी त्यास मारकच ठरतील. बँकिंगच्या प्रसारास आळा बसला तर त्यामुळें बँकांतील नोकऱ्यांची संख्या वाढणार नाहीं व नोकरांना अधिक चांगल्या जागा मिळण्यास वाव उरणार नाहीं हें उघड आहे. बँक अवार्डमुळें अशी परिस्थिति निर्माण होईल किंवा काय हा येथें प्रश्न उपस्थित होतो. कोणती मर्यादा ओलांडली, कीं पगारवाढ नोकरवर्गाच्या अंतिम हितास बाधक ठरेल, हें सांगणें कठीण आहे आणि पुढील पिढींच्या हितासाठी आजचे नोकर कायद्यानें मिळूं शकणाऱ्या पगारापेक्षा कमी पगार स्वीकारतील हें शक्य वाटत नाहीं. बँकांचे ठेवीदार व सर्वसामान्य जनता ह्यांच्या हिताचा विचारच अधिक महत्त्वाचा आहे. नोकरांच्या मागण्या व बँकांचें आर्थिक सामर्थ्य ह्यांचा मेळ घालण्याचा प्रश्न महत्त्वाचा होतो. व्यापक हिताच्या दृष्टीनें, निवाड्याची अंमलबजावणी करणें इष्ट होणार नाहीं असें सरकारला वाटलें, तर निवाडा अमान्य करण्याचा किंवा त्यांत दुरुस्ती करण्याचा अधिकार सरकारला कायद्यानें दिलेला आहे. ह्या अधिकाराचा उपयोग करावयाचा किंवा काय, हें ठरविण्यासाठींच सरकारनें वेळ मागून घेतलेला आहे. सरकारनें बँकांचे व नोकरवर्गाचे प्रतिनिधी ह्यांची बैठक भरवून त्यांच्यांत मतैक्य घडवून आणण्याचा प्रयत्न करावा, अशी एक सूचना पुढें आलेली आहे.

### ठेवींवरील व्याजाची कमाल मर्यादा

बँकांनीं ठेवींवर द्यावयाच्या व्याजाच्या कमाल मर्यादा आपआपसांत समजुतीनें ठरविण्यासाठी प्रमुख बँकर्सची एक सभा २४ मे रोजीं मुंबई येथें इंपीरिअल बँकेचे मॅ. डायरेक्टर श्री. एस. के. हंडू ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. ह्या प्रश्नाचा खोल विचार करून सूचना करण्यासाठी सभेनें एक उपसमिति नेमली आहे. तिच्यांत इंपीरिअल बँकेचे २, इंडियन बँक्स असोसिएशनचे ३ व एक्सचेंज बँकांचे ३ प्रतिनिधी आहेत.

### खोट्या कंपन्यांच्या विरुद्ध इषारा

उत्तर भागांत खोट्या नांवानें कंपन्या काढून लोकांना फस विण्याचे प्रकार बरेच दिसून आले आहेत. ह्या कंपन्या मोठमोठ्या जागा देण्याचें आमिष दाखवून गरजू लोकांची फसवणूक करतात असें आढळून आलें आहे. मद्रास सरकारनें अशा फसव्या लोकांपासून सावध राहण्याचा इषारा देणारें एक पत्रक प्रसिद्ध केलें आहे. ह्या कंपन्यांचें तंत्र ठराविक आहे. सर्व महत्त्वाच्या वृत्तपत्रांतून ह्या कंपन्या नोकर पाहिजे असल्याच्या जाहिराती देतात आणि अर्ज मागवितात. कांहीं वेळा गरजू अर्जदारांकडून रोख डिपॉझिटसहि घेण्यांत येतात. नोकरी मात्र देण्यांत येत नाहीं. अर्जदाराला आपल्या खर्चानें मुलाखतीसाठी कलकत्त्याला बोलावण्यांत येते. कलकत्त्याला एखाद्या ऑफिसांत त्याची मुलाखतहि घेण्यांत येते. कचेरींत ह्या ठकांच्या टोळीपैकीच कांहीं लोक काम करीत असल्याचा देखावा करतात. कचेरी अगदीं व्यवस्थित अशी असते. मुलाखतीनंतर उमेदवाराला असें सांगण्यांत येतें कीं, डिपॉझिट ठेवण्यासाठी त्यानें आणलेल्या रकमेंतून जर कांहीं शेअर्स खरेदी करण्यांत आले तर त्याला नोकरी देतां येईल. कांहीं शेअरअर्जांवर त्याची सही घेऊन पैसे घेण्यांत येतात व त्याला पावतीहि देण्यांत येते. नंतर उमेदवार अर्थातच आपल्या गांवीं परत जातो. तेथून दोन-तीन स्मरणपत्रें धाडल्यावर एकदाचें नेमणुकीचें पत्र येतें. नेमणूक पत्राबरोबर नोकरीच्या अटीहि पाठविल्या जातात. अटी अशा असतात कीं त्या पाळणें अशक्यच असतें. अखेर अर्जदाराला आपली फसवणूक झाल्याचें कळून येतें. अशा प्रकारचीं उदाहरणें अलीकडे फारच वाढलीं आहेत. म्हणून नोकरी मिळवूं पहाणाऱ्या उमेदवारांनीं रोख डिपॉझिट ठेवूं नये आणि शेअर्सहि घेऊं नयेत; कंपनीविषयीं अधिक चौकशी करून खात्री पटल्याशिवाय ह्या गोष्टी करूं नयेत असा इषारा देण्यांत आला आहे.

### विटा तयार करण्याचा सहकारी धंदा

उत्तर-प्रदेशांत विटा तयार करण्याचा धंदा सहकारी तत्त्वावर गेलीं कित्येक वर्षे चालविण्यांत येत आहे. हा धंदा करणाऱ्या बऱ्याच सहकारी संघटना राज्यांत असून त्यांची प्रगतीहि चांगली झाली आहे असें धंद्याच्या अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. १९४८ सालीं उत्तर-प्रदेश राज्यांत सहकारी तत्त्वावर विटा तयार करणारी अवघी एकच संस्था होती. आज अशा प्रकारच्या ५२० संस्था आहेत. ह्या सहकारी संस्थांतून ४२,००० मजूर काम करीत आहेत. त्याशिवाय धंद्याशीं संबंधित अशा व्यवसायांत अप्रत्यक्षपणें १,००,००० मजूर खपत असतात. सर्व भट्ट्यांत मिळून दरवर्षी निदान १०० कोटी विटा तयार होत असतील असा अंदाज आहे. ह्या विटांची किंमत जवळजवळ २०,००,००० रुपये होते. प्रत्येक भट्टीमागें ५,००० ते १०,००० रुपये वार्षिक नफा उरतो. विटा तयार करणाऱ्या सहकारी संघटनांची संख्या अजूनहि वाढतच आहे. चालू वर्षअखेर ही संख्या १,००० पर्यंत जाईल आणि पुढील वर्षी २,००० पर्यंत जाईल असा अदमास आहे. धंद्यांत गुंतवाव्या लागणाऱ्या भांडवलासंबंधीं सरकारी अधिकाऱ्यांनीं पुढीलप्रमाणें माहिती जमविली आहे. ८० मजुरांना काम देऊं शकणाऱ्या एका विटांच्या भट्टीसाठी सुमारें १५,००० ते २०,००० रुपये भांडवल लागतें. काम करणारा प्रत्येक मजूर संघटनेचा भागदार असतो. धंद्याला लागणारा भांडवली स्वरूपाचा माल म्हणजे विटांसाठी लागणारे लहान लहान साचे. प्रत्येक साच्याला ५ ते १० रुपये पडतात. त्याशिवाय दोन घुराडीं उभारावीं लागतात. त्यांना सुमारें १,००० रुपये खर्च येतो. बारीक-सारीक हत्यारेंहि बरींच लागतात आणि त्यांच्यासाठी आणखी दोनतीनशें रुपये खर्च करावे लागतात. ग्रामीण विभागांतील लोकांना व्यवसाय पुरविण्याच्या दृष्टीनें हा धंदा उपयुक्त असून मोठ्या शहराजवळ तो चांगला चालण्यासारखा आहे.

### बिहारमधील खेड्यांची पहाणी

बिहारमधील ३५७ खेड्यांची तपासणी करण्याचें काम राज्यसरकारच्या १०० गॅझेटेड आफिसर्सनीं नुकतेंच पूर्ण केलें आहे. शेतकऱ्यांच्या जीवनासंबंधीं सर्व प्रकारची माहिती तपशीलवार गोळा करणें हें तपासणी करणाऱ्यांचें ध्येय होतें. त्यांनीं पुढील बाबींसंबंधीं अधिकृत माहिती गोळा केली आहे. प्रत्येक शेतकरी कुटुंबाच्या मालकीची असलेली जमीन, निरनिराळ्या प्रकारचे जमीनविषयक हक्क, शेतांत उत्पन्न होणारा माल, शेतकऱ्याला असलेलें कर्ज, गहाण असलेलीं शेतें व शेतकऱ्याचें एकूण उत्पन्न, इत्यादि. ह्या तपासणीचा उपयोग ग्रामीण भागांतील प्रश्न सोडविण्यास चांगला होऊं शकेल. उदाहरणार्थ, शेतीची जास्तींत जास्त जमीन धारण करण्याची मर्यादा, सहकारी शेती, पोटकुळांचें स्थान आणि शेतीचें उत्पन्न वाढविण्याचे उपाय ह्यासंबंधीं बरीच उपयुक्त माहिती तपासणीदारांनीं गोळा केली आहे. सध्यां बहुतेक खेडेगांवातून जमिनींच्या वांटण्या होऊन त्यांचे फारच लहान लहान तुकडे झाले आहेत. अशा तुकड्यांचें एकीकरण करून आर्थिकदृष्ट्या परवडतील इतक्या आकाराचीं शेतें तयार केल्याखेरीज जमिनींचें वांटप आणि एका कुटुंबाला मिळावयाच्या जास्तींत जास्त जमिनीची मर्यादा ठरविता येणें अशक्य झालेलें आहे. हा प्रश्न सोडविण्याचा यशस्वी प्रयोग हजारीबाग जिल्ह्यांत करण्यांत आला आहे. तथापि अधिक मोठ्या प्रमाणावर हाच प्रयोग करावयाचा झाल्यास अधिक नोकर लागतील आणि त्यांना आपला संपूर्ण वेळ ह्याच कामासाठी खर्च करावा लागेल असें आढळून आलें आहे शिवाय हें काम करतांना आणखीहि कांहीं अडचणी निर्माण होण्याचा संभव आहे. ह्या अडचणी दूर करण्यासाठी कायदा करून घेण्याचीहि जरूर भासूं लागली आहे. जमिनीचें एकीकरण करण्यासंबंधीच्या पंजाबमधील अनुभवाचाहि फायदा घेण्यांत येणार आहे.

---

**जपानी पद्धतीची भात शेती**—पालघर तालुक्यांतील जे शेतकरी जपानी पद्धतीनें भाताची लागवड करण्यास तयार असतील त्यांना मदत म्हणून मुंबई सरकारनें १,२५,००० रुपयांचीं कर्जे देण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक एकर भातशेतीमागें १२५ रुपये कर्ज देण्यांत येणार आहे. महसूल खात्याचे अधिकारी आलेल्या अर्जांचा विचार जागच्या जागीं करून कर्जें मंजूर करणार आहेत.

**बाकूमध्यें टेलिव्हिजनची सोय**—रशिआंतील तेल-निर्मितीचें एक प्रमुख केंद्र बाकू येथें टेलिव्हिजनच्या प्रक्षेपणाचें केंद्र उघडण्यांत येणार आहे. सोव्हिएट रशिआच्या प्रचाराचें हें प्रभावी केंद्र होईल अशी भीति इंग्लंड आणि अमेरिका ह्यांना वाटत आहे. कारण, मध्यपूर्वेतील हॉटेल्स आणि सार्वजनिक ठिकाणें ह्यांत असलेल्या रेडिओवरून हा प्रचार सहज ऐकूं जाऊं शकेल.

## भारत रशिअन तांत्रिक मदत घेणार ?

रशिआनें भारताला तांत्रिक साह्य देण्याचें कबूल केलें आहे. ह्या मदतीचा कशा रीतीनें उपयोग करून घेतां येईल ह्यासंबंधीं भारतीय सरकार सध्यां विचार करीत आहे असें समजतें. ह्या कामासाठीं भारतीय यंत्र–विशारद आणि रसायन–विशारद ह्यांचें एक प्रतिनिधीमंडळ रशियांतील परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठीं पाठविण्यांत येणार आहे, अशी वार्ता आहे. प्रतिनिधीमंडळावर भारत–सरकारच्या व्यापार व उद्योग खात्यांतर्फे माणसें नेमण्यांत येतील. भारताला भांडवली मालाची गरज असल्यानें प्रतिनिधी–मंडळांत व्यापारी गटाच्या कांहीं लोकांचाहि समावेश करण्यांत येणार आहे. यंत्रसामुग्री आणि इतर भांडवली माल रशिआकडून मिळण्याची शक्यता अजमावून पहाण्याचें कार्य हे व्यापारी प्रतिनिधी करतील. रशिआपासून भांडवली स्वरूपाचा माल घेण्याच्या कामीं इतर अनेक अडचणींमध्येंच तांत्रिक स्वरूपाची अडचण विशेष महत्त्वाची आणि दूर करण्यास कठीण अशी आहे. भारतामधील बहुतेक सर्वच कारखाने ब्रिटिश अथवा अमेरिकन बनावटीचे आहेत. त्यामुळें ते चालवितांना लागणारें दैनंदिन स्वरूपाचें तांत्रिक साहित्यहि साहजिकच त्या देशांकडून आणावें लागतें. ह्या कारखान्यांच्या गरजा रशिआकडून भागविणें म्हणूनच फार कठीण जाणार आहे. जुन्या कारखान्यांच्या बाबतींत ही अडचण भासत असली तरी नव्यानें निघावयाच्या कारखान्यांना ती भासण्याचें कारण नाहीं. नव्या कारखान्यांतून रशिअन बनावटीची यंत्रसामुग्री निदान प्रयोग म्हणून तरी बसविण्यास हरकत नाहीं. जुन्या कारखान्यांच्याहि गरजा रशिआ भागवू शकत असेल आणि तसें करणें आर्थिक दृष्टीनें सोईचें असेल तर तशा त्या भागवून घेण्यास हरकत असण्याचें कारण नाहीं. कारण, भारताच्या सध्याच्या तांत्रिक विकासाच्या अवस्थेंत योग्य अटींवर तांत्रिक साह्य मिळाल्यास तें कोणाकडूनहि घेण्यास हरकत नाहीं, असेंच भारताचें धोरण आहे.

## डॉलरची किंमत

खालील तक्त्यांत २७ देशांत अमेरिकन डॉलर मिळविण्यासाठीं अधिकृत हुंडणावळीपेक्षा किती ज्यास्त किंमत पडते, तें दर्शविलें आहे. अर्थात् काळ्या बाजारांतील हुंडणावळीच्या 'दरा'वर हा तक्ता आधारलेला आहे. डॉलरच्या मानानें इतर चलनांची किंमत कृत्रिमरीत्या ज्यास्त ठेवण्यांत आलेली आहे, असा त्याचा अर्थ केला जातो.

| | % | | % |
|---|---|---|---|
| वॉरसा | ९४९ | इस्तनबुल | १२२ |
| पूर्व बार्लिन | ७१० | तैपी | १०० |
| ला पाझ | ६६३ | बेलग्रेड | ९३ |
| मॉस्को | ४७५ | कराची | ९१ |
| सोफिया | ४४४ | काबूल | ८३ |
| प्राग | ४०० | ब्युनॉस एरिस | ७९ |
| बुडापेस्ट | ३३७ | हेलसिंकी | ६४ |
| बुखारेस्ट | ३०८ | मॉंटिव्हिडो | ६३ |
| तेहरान | १८० | शांघाई | ६२ |
| सॅनटिॲगो | १७८ | टोकियो | २१ |
| रिओ | १६२ | मनिला | २१ |
| जकार्ता | १५४ | सॅन जोस | १९ |
| टेलअविव्ह | १५० | मेलबर्न | १४ |
| | | माद्रिद | १० |

## जागतिक आर्थिक संस्थांच्या सभा

इंटर नॅशनल बँक व इंटर नॅशनल मोनेटरी फंड ह्यांच्या वार्षिक सभा वॉशिंग्टन येथें २४ ते २९ सप्टेंबर अखेर भरणार आहेत. कोलंबो योजनेच्या सल्लागार समितीची सभा ओटावा येथें ४ ऑक्टोबर रोजीं भरेल. ह्या सभांस अर्थमंत्रि श्री. देशमुख हजर रहाणार आहेत.

## स्पेन्सर रिफ्रेशमेंट रूम्स बंद होणार

दक्षिण रेल्वेवर गेलीं ७० वर्षें चालू असलेल्या स्पेन्सर कंपनीच्या रिफ्रेशमेंट रूम्स येत्या ऑगस्टपासून बंद केल्या जातील. दारूबंदी व इतर कारणें ह्यांचा हा परिणाम आहे. सुमारें ६० रिफ्रेशमेंट रूम्स बंद होऊन त्यांतील सुमारें १,००० नोकर बेकार होतील.

**काश्मीरमध्यें प्रवाशांची गर्दी**—उत्तर–भारतांत उन्हाळा जोरांत सुरू झाल्यामुळें काश्मीरला जाणाऱ्या हौशी प्रवाशांची गर्दी वाढू लागली आहे. आतांपर्यंत ८,००० प्रवासी काश्मीरांत गेले असून गर्दी आणखीहि वाढत आहे. कांहीं बंद झालेली होटेल्स पुन्हा खुलीं झालीं आहेत. जून व जुलैमध्यें काश्मीरमधील दुकानदारांना व बोटवाल्यांना चांगली प्राप्ति होईल असा अंदाज आहे.


# B. M. College of Commerce, Poona-4

The College will open for the new academic year on 21st June, 1954. Students desirous of taking the Commerce Course after their S. S. C. examination should apply immediately in the prescribed form with the admission fee of Rs. 22/-. The prospectus giving detailed information about the courses and rules of admission to different classes can be obtained from the office for SIX ANNAS.

Under new ordinances of the Poona University, a commerce graduate can appear for the B. A. examination without keeping terms in an arts college.

T. M. JOSHI,
Principal.

# Deccan Institute of Commerce

**594, Budhwar Peth, Poona 2.**

Opens for the 1954-55 Session on Monday the 21st June 1954. Students coached up for G. C. D., L. C. C., D. Com., C. A. (First Part), G. D. C. & A., Dip. L. A., C. A. I. I. B.; Shorthand; Typewriting Examinations. Morning and Evening classes. Admission to respective Diploma Courses open to Matriculates, Undergraduates, and Graduates.

Prospectus free on application to the Secretary.

### दि त्रावणकोर ओगले ग्लास मॅ. कं. लि., मंजुमेल

वरील कंपनीनें ३१ डिसेंबर, १९५३ अखेर संपलेल्या वर्षी सुमारें ९ लक्ष रुपये किंमतीचा काच माल तयार केला व सर्व खर्च भागवून आणि ४१,०५२ रु. घसारा काढून ४६,७५५ रु. निव्वळ तोटा उरला. वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत कामगारांशीं प्रदीर्घ वाटाघाटी चालू होत्या व उत्पादन असमाधानकारक झालें. कामगारांनीं बदललेली व्यापारविषयक परिस्थिति लक्षांत घेऊन अधिक उपकारक धोरण अवलंबिणें आवश्यक आहे. काच-मालाची बाजारांतील किंमत उतरत चालली आहे. परंतु त्या मानानें उत्पादनखर्चांत घट होत नाहीं. खर्च त्या प्रमाणांत न वाढवितां उत्पादन वाढविणें, हाच आतां मार्ग आहे. १९५४ च्या अखेरीस बाटल्या करण्याच्या ऑटोमॅटिक यंत्रसामुग्रीवर भरपूर उत्पादन सुरू करतां येऊन एकूण उत्पादनांत भर पडेल, अशी डायरेक्टरांची अपेक्षा आहे.

### बँकनोकरांची बँकर्सना धमकी

बँकअवार्डमध्यें नोकरांना मिळालेले फायदे कमी करण्यांत आले, तर त्याला आळा घालण्यासाठीं ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज फेडरेशन चळवळ करील, असें तिच्या जनरल सेक्रेटरीनें जाहीर केलें आहे. अवार्ड ६०,००० बँकनोकरांपैकीं ४३% नोकरांचें थोडेंफार नुकसान करणारा आहे, म्हणून नोकर असंतुष्ट आहेत, असें त्यांनीं सांगितलें. अवार्डचा विचार करण्यासाठीं सरकारनें दोन महिन्यांनीं मुदत वाढविली त्याबद्दल त्यांनीं आश्चर्य व्यक्त केलें. अवार्डविरुद्ध खोटा ओरडा करून खरा प्रश्न बाजूला सारण्याचा व जनतेची सहानुभूति नाहींशी करण्याचा बँकर्सचा प्रयत्न आहे, अशी त्यांनीं तक्रार केली. जीं कलमें नोकरांना फायद्याचीं आहेत, तीं बदलून घेण्याचा बँकर्सचा प्रयत्न आहे, असें ते म्हणाले.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २

" मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि " —भगवद्गीता

जून १९५३ च्या भागीदारांच्या सभेच्या वेळीं
भागीदारांना लेखी निवेदन पाठवून कळविल्याप्रमाणें

**येत्या जून १९५४ च्या अहवालांत**

★ सिंडिकेटला " SUBJECT TO DEPRECIATION " ★

**बारा लक्ष रुपये नफा झाला आहे**

मागील वर्षाचा ४,५६,५४० रुपये तोटा भरून काढून शिल्लक नफा
सात लक्ष रुपये राहील

≡ डिव्हिडंड देण्याचा ठराव मंजूर करणें भागीदारांच्याकडे आहे ≡

**यापुढें दरवर्षी पूर्वीप्रमाणें सिंडिकेट नफ्यांतच चालणार**

**★ WAIT AND SEE ★**

**ठेवींच्या व्याजाचे दर**

★ मुदत पांच वर्षें — व्याज ७॥ ( साडेसात ) टक्के.
★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ ( सात ) टक्के.
★ मुदत एक वर्ष — व्याज ६ ( सहा ) टक्के.

ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीपथ, पुणें २.
दि. २६-५-१९५४

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंट्स्.

# समाज विकास-योजना कामकाजाचें मूल्यमापन

## अपेक्षा, अडचणी व परिस्थिति

समाज विकासयोजनांच्या कामकाजासंबंधीं नियोजनमंडळाच्या कार्यक्रम मूल्यामापन संघटनेचें पहिलें प्रतिवृत्त संसदेस सादर करण्यांत आलें आहे. राष्ट्रीय कल्याणाच्या क्षेत्रांतील अग्रगामी प्रयोग असणाऱ्या या समाज विकासयोजनांच्या कामकाजाचें मूल्यमापन करण्यासाठी नियोजनमंडळानें ही स्वतंत्र संघटना तयार केली असून तिचे प्रमुख स्थानीं प्रा. द. गो. कर्वे ह्यांची योजना केलेली आहे. प्रो. कर्वे ह्यांच्या विवेकनिष्ठ आशावादाची छाप अहवालावर पडली असली, तर तें सहाजिकच आहे. नियोजनमंडळानें मूल्यमापन संघटनेचें नेतृत्व प्रो. कर्वे ह्यांचेकडे दिलें त्यामुळें मूल्यमापनसंघटनेच्या विचारांस व सूचनांस स्वतंत्र बुद्धीची, विचारांची व अनुभवाची बैठक प्राप्त झाली, हा मोठाच फायदा आहे. अहवालाची शब्दयोजना अर्थपूर्ण आहे.

## सहकारी संस्थांची कामगिरी

उत्पादनवाढीचें लक्ष्य हळूहळू जवळ येत चाललें आहे, ह्यांत संशय नाहीं, असें अहवालांत म्हटलें आहे. शेतीच्या बाबतींत विकासयोजनांना बरेंच यश प्राप्त झालें आहे, पण रस्ते, शाळा, इस्पितळें, सहकारी संस्थांची वाढ, इत्यादि बाबतींत प्रगति निराशाजनक आहे. सहकारी संस्था किंवा ग्रामपंचायती ह्यांचेकडून अपेक्षित भरीव कामगिरी घडत नाहीं, ही विचारार्ह बाब आहे. विकासयोजनांचे अधिकाऱ्यांनींच सर्व कांहीं करावयाचें आहे; जनतेनें कांहीं केलें नाहीं तरी चालेल, अशी भावना प्रसृत होता कामा नये. कामाचा उठाव लवकर व्हावा ह्या सद्भावनेनें सहकारी उपक्रमांस दुय्यम स्थान देण्याची वृत्ति कांहीं ठिकाणीं मूल्यमापन-मंडळास आढळली. परस्पर-सहकाराची भावना वाढीस लावण्याचें महत्त्व मंडळानें मुद्दाम स्पष्ट करून सांगितलें आहे.

## प्रवृत्तींचें दर्शन

अठरा निवडक मूल्यमापनकेंद्रांच्या कसून केलेल्या पाहणीवर हे निष्कर्ष अवलंबून असल्याचें अहवालाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. यांपैकी १३ केंद्रें समाज विकासयोजना विभागांत व ५ प्रायोगिक शेती विस्तारकेंद्रें होतीं. या पाहणीचे जोडीस या संघटनेचे संचालक प्रा. द. गो. कर्वे, व इतर अधिकारी यांनीं निरनिराळ्या योजनाविभागांस वारंवार दिलेल्या भेटी आणि मध्यवर्ती ठिकाणच्या व राज्यांतील समाज विकासयोजनाधिकाऱ्यांशीं या संघटनेनें ठेवलेले संबंध यांचीहि मदत झाली. एकंदर योजनाविभाग व विस्तार गट यांची संख्या मूल्यमापनकेंद्राच्या मानानें फारच मोठी असल्यामुळें 'हें प्रतिवृत्त केवळ प्रवृत्तिनिदर्शक समजण्यांत यावें आणि विशिष्ट विभागांच्या चौकशीचें प्रतिवृत्त असें मानूं नये' यावर मूल्यमापनसंघटनेनें भर दिला आहे.

पुढील गोष्टींबाबत विशेषतः पाहणी करण्यांत आली. (१) समाज विकास योजनेच्या संपूर्ण अंमलबजावणीसाठी घालून दिलेली कालमर्यादा, (२) विद्यमान पंचायतींची स्थिति आणि कार्यक्रम अंमलांत येण्याचे बाबतींत सहकारी संस्थांचें स्थान, (३) कारभाराविषयक संपूर्ण सहकार्य असण्याची गरज, (४) शिक्षित नोकरवर्गाची पुरेशी संख्या, (५) योजना-सल्लागारसमित्यांची भूमिका, (६) प्रत्यक्ष साध्य झालेल्या गोष्टी, (७) जनतेंत पुरोगामी दृष्टिकोनाची निर्मिति आणि (८) समाज विकास योजनांत रोजगारीस असलेला वाव.

## कालमर्यादा

समाज विकासकार्यक्रम सुरू झाला तेव्हां एकादी योजना संपूर्णतया अंमलांत येण्यासाठी तीन वर्षें ही कालमर्यादा घालून दिल्यामुळें सबंध कार्यक्रमांत त्वरा आली असली तरी लक्ष्य साध्य होण्यांत 'अकारण घाई' नको असा इशारा प्रतिवृत्तांत दिला आहे. कारण, जरी अशा प्रकारें तीं लक्ष्यें साध्य झालीं तरी ही चळवळ मूळ धरणार नाहीं. सर्व गोष्टी तयार असल्या तरी ठरविलेल्या तीन वर्षांच्या कालमर्यादेंत विकासात्मक प्रगतीचा पहिला टप्पा गांठणें शक्य होणार नाहीं आणि म्हणून एकादी विकासयोजना व्यवस्थितपणें कार्यान्वित होण्यासाठी एकूण पांच ते सहा वर्षांचा अवधी अवश्य ठरेल, असें मत प्रतिवृत्तांत दिलें आहे.

## जनतेचा वांटा

सर्व खेड्यांत बिनचूक दप्तर ठेवल्यावांचून जनतेनें भाग घेतल्यामुळें भांडवलांत प्रत्यक्ष किती भर पडली याचा विश्वसनीय आंकडा मिळूं शकणार नाहीं. परंतु रस्ते, बंधारे, कालवे इ. स्वरूपांत जनतेच्या सहकारानें साध्य झालेल्या गोष्टी उल्लेखनीय प्रमाणांत आहेत. तसेंच शाळा, रुग्णालयें इत्यादि स्वरूपांत सुखसोयींची झालेली वाढहि डोळ्यांत भरण्याजोगी असून त्यांचे देशाच्या कल्याणाच्या व अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें होणारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ बरेच आहेत.

## जनतेची टिकाऊ संघटना

अशा प्रकारें जनतेच्या उत्साहाबाबत कांहींहि तक्रार करण्याजोगी स्थिति नसली तरी, हा उत्साह टिकवून धरतील अशा कायम संस्था उभारणें आणि समाज विकासकार्यक्रमासारखींच कायम स्वरूपाचीं कामें काढणें या गोष्टींकडे अधिक लक्ष देणें जरूर आहे. बऱ्याच राज्यांत निरनिराळ्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या हंगामी लोकनियुक्त संस्था तयार करण्यांत आल्या असून विधायक कार्य होण्याचे कामीं अडचणी आल्या असत्या अशा विभागांत त्यांचा उपयोग दिसून आला आहे; त्यांना नियमित स्वरूप व स्थान प्राप्त होण्याचे दृष्टीनें अशा संस्थांचें शैक्षणिक स्वरूप लक्षांत घेणें जरूर असून हें काम कमाल प्रयत्नांचा प्राथमिक कालखंड पुरा होण्याचे आधीं झालें पाहिजे असें प्रतिवृत्तांत म्हटलें आहे. हें अंग लक्षांत घेतलें नाहीं तर समाज विकासकार्यक्रमासाठी असलेला खास नोकरवर्ग व मिळणारी मदत बंद झाल्यावर तें काम पुढें चालविण्यासाठी जनतेची संघटना अशी अस्तित्वांतच राहणार नाहीं!

## सहकारी संस्था

कार्यक्रम अंमलांत आणण्याचे कामीं सहकारी संस्थांचाहि उपयोग आहे. सहकारी संस्थांच्या दृष्टिकोनांत बदल करण्याची सूचना करून प्रतिवृत्तांत असें म्हटलें आहे कीं, विकास कार्याच्या सरकारमान्य गोष्टींसाठी कर्जे देतांना सदस्याची पत विचारांत न घेतां ज्यासाठी कर्ज दिलें त्या वस्तूच्या उपयोगाकडे लक्ष देण्यांत यावें.

## नोकरवर्ग व ग्रामसेवक

निरनिराळ्या विभागांत विकास कार्यांत दिसून येणाऱ्या विषमतेस त्या त्या विभागांत नेमलेल्या नोकरवर्गाची संख्या ह

महत्त्वाचें कारण आहे. जिल्ह्यांतील विकास कार्यांत कारभार-विषयक अवश्य ती सुसूत्रता ठेवण्याची जबाबदारी त्या त्या जिल्हाधिकाऱ्यावर सोंपविली पाहिजे असें प्रतिवृत्तांत सुचविलें आहे. दुसरें म्हणजे पुरेसे ग्रामसेवक असणें हीहि महत्त्वाची बाब आहे. शेती विस्तारकार्याचा प्रतिनिधी या नात्यानें ग्रामसेवकानें आपली जरूरी सिद्ध केली असल्यामुळें उपलब्ध होणाऱ्या ग्रामसेवकांच्या संख्येच्या गतीनेंच विस्तारकार्यांची गति वाढवावी. खरीखुरी शेतीविषयक आवड असणाऱ्या व्यक्ती शेती विस्तार-संघटनेंत भरती करण्याची गरज प्रतिवृत्तांत प्रतिपादन केलेली आहे.

कार्यक्रम अंमलांत येण्याचे दृष्टीनें शिक्षित नोकरवर्ग असण्याच्या गरजेवर भर देऊन प्रतिवृत्तांत असें म्हटलें आहे कीं, खरोखरच पात्र आणि शिक्षित उमेदवार पुरेशा संख्येंत मिळत नसतील तर विकासयोजनांचा विस्तारहि अवश्य तेवढ्या प्रमाणांतच करावा. कारण असें केलें नाहीं तर असमाधानकारक निष्कर्ष मिळून सबंध योजनाच फुकट जाईल. आतांपर्यंत काम हातीं घेण्यांत आलें असलेल्या विभागांत, कामांत संघटितपणा आणण्यास बराच वाव आहे. चालू योजनांच्या संघटनेंत वा पुरवठ्यांत सुधारणा करण्याआड येणाऱ्या योजनाविभागांची संख्या वाढविण्याचा किंवा विभागाचें क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न अवश्यमेव टाळला पाहिजे असें म्हटलें आहे.

### जनतेच्या दृष्टिकोनांत झालेला फरक

'ग्रामीण जनतेंत प्रागतिक दृष्टिकोन निर्माण होत आहे ही गोष्ट निःसंशय,' असें मत समाज विकास कार्यक्रमानें जनतेंत हा दृष्टिकोन बाणविण्याचे कामीं केलेल्या कामगिरीबद्दल म्हटलें आहे.

### योजना सल्लागार समित्या

योजना सल्लागार समित्यांनीं त्यांचेकडून अपेक्षा असलेलें काम केल्याचीं फारच थोडीं उदाहरणें असल्याचें या प्रतिवृत्तांत खेदपूर्वक नमूद केलें आहे. खास्यांचे जिल्हाप्रमुख व आमदार व स्थानिक संस्थांच्या प्रतिनिधींसुद्धां बिनसरकारी सदस्य असणाऱ्या या समित्या नियमितपणें बैठका भरवून सर्व समाजविकास-कार्यक्रम ज्या पद्धतीनें पार पडावा अशी अपेक्षा आहे, त्या पद्धतीनेंच काम करतील अशी अपेक्षा होती. परंतु दुर्दैवानें या अपेक्षा फलद्रूप होण्याआड बऱ्याच गोष्टी आल्या आहेत. कांहीं राज्यांत तर अशा समित्या एक वर्ष होऊन गेलें तरी नेमलेल्याच नाहींत. फारच थोड्या समित्यांच्या बैठका नियमितपणें होतात; तर इतर कांहीं बाबतींत वर्षांत एकदां भरलेली तेवढीच काय ती पहिली बैठक अशी स्थिती आहे. कांहीं बाबतींत तर योजना अधिकाऱ्यांना या समित्या उपयुक्त करण्याऐवजीं अडचणी आणणाऱ्याच आहेत असें दिसून आलें. कांहीं समित्यांवरील अधिकारी देखील नियमितपणें उपस्थित नसत.

### लक्ष्यें

अधिक कसून पाहणी करण्यानेंच साध्य झालेल्या गोष्टींची प्रत्यक्ष गणना करतां येईल, असें सांगून 'एकंदरींत परिणाम इतका उघड आहे कीं, उत्पादनवाढीचें उद्दिष्ट हळूहळू साध्य होत आहे,' असें प्रतिवृत्तांत म्हटलें आहे. तरी पण अवर्षण वा पूर यांनीं या प्रवृत्तीवर परिणाम होणार नाहीं किंवा आर्थिक चढउतार व किंमतींतील फेरबदल यांचा शेतकी धंद्याच्या फायद्यां-वर प्रतिकूल परिणाम होणार नाहीं, असा याचा अर्थ नव्हे.

### रोजगारीस असलेला वाव

समाज विकासयोजनांमुळें रोजगार मिळण्यांत झालेल्या वाढीबाबत प्रतिवृत्तांत असें म्हटलें आहे कीं, शेतकीचे क्षेत्रांत रोजगारीचें प्रमाण वाढलें आहे, परंतु इतर बाबतींत पाहतां समाज-विकासयोजनांमुळें प्रत्यक्ष नोकऱ्यांत भर पडूं शकण्यास फार थोडा वाव आहे. देशांतील बेकारीचा प्रश्न सोडविण्याचे बाबतींत समाज विकास योजना व शेती विस्तार संघटना कांहीं एका मर्यादेपर्यंत खात्रीनें हातभार लावूं शकतील. साधनसंपत्तींत वाढ आणि प्रागतिक दृष्टिकोन या गोष्टींमुळें सामाजिक व आर्थिक क्रांतीच्या चळवळीस बल प्राप्त होईल आणि त्यामुळेंच साधन-संपत्ति व नोकऱ्या यांमध्यें एकंदरींत जुळणी होण्यास मदत होईल. हाच एक महत्त्वाचा लाभ असून नियोजकाच्या दृष्टीनें हीच मोठी संधि आहे.

---

### मराठा चेंबरचे नवे अध्यक्ष

श्री. रा. ग. विजयकर, मुंबई, ह्यांची मराठा चेंबरच्या अध्यक्षपदीं अविरोध निवडणूक होईल, असें समजतें. श्री. म. रा. साठे, श्री. दा. वा. पोतदार, श्री. शं. ल. किर्लोस्कर व श्री. म. वि. पुराणिक हे उपाध्यक्ष होतील.

---

## अन्योन्य सहायकारी मंडळी लि., बडोदें

### प्रो. माणिकरावांना श्रद्धांजलि

बडोद्यांतील प्रसिद्ध मल्लविद्याविशारद श्री. जुम्मादादा व्यायामशाळेचे संस्थापक व अन्योन्य सहायकारी मंडळीचे जुने सभासद राजरत्न श्री. गजानन यशवंत माणिक उर्फ प्रो. माणिकराव यांचें ता. २५–५–५४ मंगळवार रोजीं आकस्मिक निधन झालें. मंडळीनें त्यांच्या निधनाबद्दल सभेचें काम बंद ठेवून शोकदर्शक ठराव मंजूर केला. तसेंच अध्यक्ष श्री. स. अ. सुधाळकर यांनीं व्यवस्थापक मंडळाचे सभासदासह पुष्पहार अर्पण केला. परमेश्वर मृतात्म्यास शांति देवो.


पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि. १२५ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो

* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी–विक्री.
* वैशिष्टयपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार–SANCCSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.